जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 MAY 2024
लोकमत

# शिष्यवृत्तीसाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांत शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या १४ प्रकारच्या शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, अशा १४ प्रकारच्या शिष्यवृत्ती देण्यात येतात. याचा लाभ मिळविण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAY 2024
तरुण भारत

# शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास १५ जूनपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** विद्यापीठातील अधिविभागामधील शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांसाठी १५ जूनपर्यंत मृदतवाढ दिलेली आहे. सन २०२२-२३ वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरलेले आहेत, त्यांच्या अर्जाची त्रुटीची पूर्तता करण्यासाठी व सन २०२३-२०२४ साठी ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना नवीन अर्ज भरण्यासाठी व नूतनीकरण करण्यासाठी १५ जूनपर्यंत शासनस्तरावर मुदतवाढ दिलेली आहे. यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, विविध राखीव प्रवर्गनिहाय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती / फ्रिशिप योजना, अल्पसंख्यांक विद्यार्थी शिष्यवृत्ती, सेंट्रल सेक्टर स्कॉलरशीप, एकलव्य आर्थिक सहाय्य योजना, अपंग शिष्यवृत्ती, माजी सैनिक सवलत, राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती, गणित व भौतिकशास्त्र गुणवत्ता शिष्यवृत्ती, स्वातंत्र सैनिकांच्या मुलांसाठी शैक्षणिक सवलत शिष्यवृत्ती योजनांसाठी मुदतवाढ दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAY 2024
तरुण भारत

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परिक्षा सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु झाल्या. शुक्रवारी विविध महाविद्यालयांमध्ये २० अभ्यासक्रमांची परीक्षा सुरळीत पार पडल्या. परीक्षेसाठी ६६७० विद्यार्थ्यांपैकी ५२५ विद्यार्थी अनुपस्थित होते. १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. आजअखेर २३० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथके स्थापन केली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAY 2024
पुढारी

# विद्यापीठातर्फे उन्हाळी सत्रातील २२८ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर २२८ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर जाहीर करण्यात आले आहेत.




विद्यापीठ उन्हाळी सत्रातील परीक्षा सध्या सुरू आहेत. शुक्रवारी मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ बिझनेस अडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ लॉ, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, पीजी डिप्लोमा इन इंटरनॅशनल रिलेशन, पीजी डिप्लोमा इन सिक्युरिटी स्टडीज, डिप्लोमा कोर्स इन जापनीज लँग्वेज, एम.एस्सी. (इंडस्ट्रियल केमिस्ट्री) आदी २० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला ६ हजार ६७० विद्यार्थी बसले. त्यामधील ५२५ विद्यार्थी गैरहजर होते. दि. ३ मे रोजी मास्टर ऑफ रूरल स्टडीज, सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग, सर्टिफिकेट इन मोडी लँग्वेज, बी.व्होक हॉर्टीकल्चर सायन्स अँड टेक्नॉलॉजी आदी १२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.